# <u>घोषणा</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत खाली नमूद केलेल्या पदाच्या मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या असून मुलाखतीच्या तारखा पदनामासमोर दर्शविण्यात आलेल्या आहेत. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखतपत्रे ऑन लाइन अर्ज प्रणालीच्या उमेदवारांना त्यांच्या प्रोफाइलमध्ये लवकरच उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. उमेदवारांनी User ID व Password द्वारे Login करुन स्वतःच्या पत्राची प्रत घ्यावी. ज्या उमेदवारांना मुलाखतपत्रे प्राप्त होणार नाहीत अशा उमेदवारांनी आयोगाच्या ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग,कुपरेज, मुंबई-४०००२१ येथील मुख्य कार्यालयात व्यक्तीशः संपर्क साधावा.

| अ.क्र. | पदाचे नाव | मुलाखतीचा दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | अधिष्ठाता, शासकीय कला संस्था, कला संचालनालय, महाराष्ट्र कला शिक्षण सेवा, गट-अ (जाहि.क्र.१३/२०१५ ) | ०६ मे, २०१६ सकाळी ९:४५ वा |

टीप- १) जाहिरातीतील तरतुदिनुसार उमेदवारांनी शिकविण्याचा दावा केलेल्या अनुभवाच्या कालावधीच्या नियुक्तीस विद्यापीठाची अथवा कला संचालनालयाची (लागू असेल त्यानूसार) मान्यता असल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलविण्यात येत आहे.

२) आपण Online व्दारे अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे आपणांस आयोगाकडून मुलाखतीकरीता बोलाविण्यात आले आहे. मुलाखतीपूर्वी आपण दिलेली अर्जातील माहिती आपल्या मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येईल. अर्ज तपासणीच्या वेळी आपण या पदासाठी अर्हताप्राप्त नसल्याचे आढळून आल्यास, आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल व आपली मुलाखत घेतली जाणार नाही.

**ठिकाण – मुंबई**
**दिनांक - २६/०४/२०१६**

श्रीधर पाठक
उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.